| | |
|---|---|
| MHRG110009062025 | दाखल तारीख – १०.११.२०२५ |
| | नोंदणी तारीख – १०.११.२०२५ |
| | निकाल तारीख – ०१.०८.२०२६ |
| | कालावधी – ०० वर्षे, ०८ महिने, २२ दिवस |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड यांचे न्यायालयात**

**पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५०४/२०२५. निशाणी क्र. १७/क**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल क्रमांक | ६१/२०२५. |
| गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | महाराष्ट्र सरकारतर्फे, तळा पोलीस ठाणे |
| निकालाचा दिनांक | ०१.०८.२०२६ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, तळा पोलीस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे वकील | श्री. पी. जे. गावंड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **सुनिल कृष्णा हिरवे**<br>वय – २९ वर्षे,<br>राहणार – धनगरवाडी, ता. तळा,<br>जि. रायगड. |

| | |
|---|---|
| आरोपीतर्फे वकील | श्री. आर. जे. पांढरे. |

## भाग 'ब'
## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०९.१०.२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ०९.१०.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १०.११.२०२५ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | १०.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०१.०८.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोपीने केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल कृष्णा हिरवे | सी.आर.पी.सी. कलम ४१अ/१ अन्वये नोटीस | -- | मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई). | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | एकनाथ भानजी देवे – साक्षीदार क्र.१ | ०८ | पंच |
| २. | पुजा हरी गावडे – साक्षीदार क्र.२ | ११ | फिर्यादी |
| ३. | शंकर काशीनाथ वारगुडे – साक्षीदार क्र.३ | १५ | तपासी अंमलदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | पंचनामा | ०९ |
| २. | तक्रार | १२ |
| ३. | छापील प्रथम खबरी अहवाल | १३ |
| ४. | रासायनिक प्रयोगशाळेत मुद्देमाल पाठविल्याबाबतचे पत्र | १६ |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०१.०८.२०२६ पारित केला.)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवणेत आलेला आहे.

### अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत

२. सदर प्रकरणात पी. एच. गावडे, महिला, पोलीस शिपाई, २५१ या फिर्यादी आहेत. दि.०९.१०.२०२५ रोजी ऑल आउट ऑपरेशन असल्याने फिर्यादी व त्यांचे सहकारी कारवाई करीत होते. खिरीट यांना गुप्त माहिती मिळाली की, मौजे रहाटाड रोडवर खांबवली बौध्दवाडी गावच्या पुढे ओढ्याच्या पुलावर आरोपी हा अवैद्य गावठी दारु विक्री करतो. म्हणून फिर्यादी सहका–यांसह खाजगी वाहनाने मौजे खांबवली गावच्या नाक्यावर गेले. तेथे दोन पंच बोलाविले. त्यानंतर मौजे रहाटाड रोडवर खांबवली बोध्दवाडी गावच्या पुढे ओढ्याचे पुलाचे आजुबाजुने पायी जावुन पाहिले. तेथे एक इसम प्लॅस्टीकचे सफेद रंगाचे कॅन पुढ्यात घेवुन बसलेला दिसला. सदर कॅनची पाहणी केली असता त्यामध्ये अवैद्य गावठी हातभट्टीची तयार दारु मिळून आली. म्हणून पी. एच. गावडे यांनी आरोपीविरुध्द पोलीस ठाणे तळा येथे सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादीप्रमाणे तळा पोलीस ठाणे गुन्हा नोंदणी क्र.६१/२०२५ नोंदविला. गुन्हयाचा तपास पो.हवा./२३८७ एस. के. वारगुडे यांनी केला. त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. जप्त

मुद्देमालापैकी एक सिलबंद बाटली रासायनिक विष्लेषणासाठी पाठविली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्ह्याचा आरोप नि.क्र.०६ वर नोंदविण्यात आला. आरोपीने आरोप कबूल नसल्याचे सांगून त्यांची संपरिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीने संपूर्ण घटना नाकारली व त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केल्याचे कथन केले. अभियोग पक्षाचा सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र.१७ वर नोंदविण्यात आले.

**५.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता व अभियोग पक्षातर्फे श्री. पी. जे. गावंड सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. जे. पांढरे यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाच्या निर्णयाप्रत पोहचण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्द्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०९.१०.२०२५ रोजी मौजे रहाटाड रोडवर खांबवली बौध्दवाडी गावचे हद्दीत, | |

| | | |
|---|---|---|
| | ता. तळा, जि. रायगड येथे आरोपीने त्याच्या ताब्यात गावठी दारुचा साठा विना परवाना अवैधरित्या विक्री करण्याकरिता जवळ बाळगल्याच्या स्थितीत मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे पंच एकनाथ भानजी देवे (सा.क्र.१), फिर्यादी पुजा हरी गावडे (सा.क्र.२), तपासी अंमलदार एस. के. वारगुडे (सा.क्र.३), यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र.०८, ११, १५ वर नोंदविण्यात आली आहे. अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वरील आदेशानुसार बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–**

**७.** अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार एकनाथ देवे (सा.क्र.१) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक ०९.१०.२०२५ रोजी त्यांना पंचनाम्यासाठी तळा पोलीस स्टेशन चे पोलीसांनी बोलाविले होते. ते छापा टाकण्यासाठी मौजे खांबवली बौध्दवाडी फाट्याजवळ गेले. तेथे

आरोपीकडून दारु जप्त केली व निशाणी क्र.०९ प्रमाणे पंचनामा केला. उलटतपासामध्ये पंच साक्षीदार एकनाथ देवे (सा.क्र.१) यांनी मान्य केले की, ते ब–याच वर्षापासुन पोलीस पाटील म्हणून काम करतात. ते पोलीस पाटील असल्यामुळे ब–यावेळा पोलीस पंचनाम्यासाठी त्यांना बोलावितात. पोलीसांनी आधीच टंकलेखीत केलेल्या पंचनाम्यावर सदर साक्षीदार यांनी सही केली.

८. फिर्यादी पी. एच. गावडे (सा.क्र.२) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक ०९.१०.२०२५ रोजी ऑल आउट ऑपरेशनदरम्यान खिरीट यांना कळाले. आंबवली बौध्दवाडी येथे एक इसम दारुची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार ते त्या ठिकाणी गेले. पवार यांनी पंचाना बोलाविले. त्यानंतर आंबवली बौध्दवाडी येथे पुलावरुन जात असताना तेथे एक इसम पांढ–या रंगाचा कॅन घेवुन बसलेला दिसला. आरोपीने त्याचे नाव सांगितले. आरोपीजवळील कॅनची तपासणी केली असता त्याच्याकडे ९ लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली. जप्त मुद्देमालापैकी एक बॉटल रासायनिक परिक्षणाकरिता घेतली. दोन पंचासमक्ष पवार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. त्यानंतर मुद्देमाल व आरोपीसह पोलीस स्टेशनला आले व निशाणी क्र.१२ वरील तक्रार दिली. उलटतपासामध्ये फिर्यादी पी. एच. गावडे (सा.क्र.२) यांनी मान्य केले की, बौध्दवाडी येथे ३५ ते ४० घरांची वस्ती आहे. बौध्दवाडी येथून रहाटाड येथे जाण्यासाठी रस्ता असून त्या रस्त्याला कायम वाहनांची वर्दळ असते. छाप्याकामी कधी कधी बेवारस मुद्देमाल मिळून येतो. ऑल आउट

ऑपरेशनदरम्यान वरिष्ठांना कारवाई केल्याचे दाखवायचे असते.

**९.** तपासी अंमलदार एस. के. वारगुडे (सा.क्र.३) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक ०९.१०.२०२५ रोजी गुप्त बातमी मिळाली होती की, रहाटाड रोडवर आंबवली बौध्दवाडी येथे अवैद्य दारु विक्री चालू आहे. मिळालेल्या बातमीनुसार ते व इतर पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने पंचनाम्याच्या साहित्यासह गेले. पवार पोलीसांनी पंचांना बोलाविले. आंबवली बौध्दवाडी गावचे पुढे ओढ्याच्या पुलाच्या बाजुला एक इसम प्लॅस्टीकचा कॅन घेवुन बसलेला दिसला. त्यास जागीच पकडले. आरोपीच्या ताब्यातील कॅनची तपासणी केली असता त्यामध्ये गावठी हातभट्टीची दारु मिळून आली. जागीच मुद्देमाल जप्त करुन पवार पोलीसांनी पंचनामा केला. आरोपी व मुद्देमालासह पोलीस स्टेशनला आल्यानंतर आरोपी विरुध्द गुन्हा दाखल झाला. सदर गुन्ह्याचा तपास सदर साक्षीदार यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. मुद्देमाल कलिना, मुंबई प्रयोगशाळेत पाठविले त्याबाबत पोहोच घेतली.

**१०.** उलटतपासामध्ये तपासी अंमलदार एस. के. वारगुडे (सा.क्र.३) यांनी मान्य केले की, घटनास्थळ असलेली जागा मोकळी असून तेथे नेहमी माणसांची व वाहनांची ये-जा असते. ज्या वाहनाने घटनास्थळी गेले त्या वाहनाचा नंबर सदर साक्षीदार यांना आठवत नाही. ब-याचवेळा छाप्यादरम्यान बेवारस मुद्देमाल मिळून येतो.

**११.** पोलिस साक्षीदारांच्या पुराव्यावरुन पोलिसांनी

घटनास्थळावरुन दारु जप्त केल्याचे आणि घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केल्याचे दिसुन येते. परंतु अभियोग पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेल्या मुद्देमालात दारु होती ही बाब तोंडी पुराव्यावरुन संशयापलिकडे सिद्ध होत नाही. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकवस्ती असल्याचे दिसते. घटनास्थळाची अशी परीस्थिती असताना देखील अभियोग पक्षाने या फिर्यादी व पोलीस पाटील या साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासला नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी दारुचा तपशील सांगितला नाही. पंचनाम्यापूर्वी पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असल्याचे पुराव्यात कोठेही कथन केले नाही. रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखार नसल्यामुळे सदर साक्षीदाराचे कथन संशयास्पद आहे. अशा परिस्थीतीत आरोपीवर ठेवलेला दोषारोप निर्विवादपणे सिद्ध होण्याइतपत सक्षम पुरावा या न्यायालयापुढे आलेला नाही. करीता सबब हे न्यायालय मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः –**

**१२.** अभियोग पक्ष या न्यायालयाने आरोपीवर निश्चीत केलेला मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५ (ई) अन्वयेचे दोषारोप आरोपीविरुद्ध निर्विवादपणे सिद्ध करण्यास असफल ठरलेला आहे. त्यामुळे पर्यायाने आरोपी ही निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल कॅन अपील कालावधी संपल्यानंतर कलेक्टर, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पाठविणे न्यायोचित आहे. वरील

सर्व कारणांमुळे हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**अ.** आरोपी **सुनिल कृष्णा हिरवे** यास मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**ब.** प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल दारु नाश केली नसल्यास विल्हेवाट लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जप्त (Confiscate) केली नसल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अपील कालावधीनंतर नाश करणेसाठी पाठविण्यात यावे. जप्त कॅन मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नाश करणेत यावी. तसेच जप्त रक्कम ही कायद्यानुसार शासन जमा करण्यात यावी.

**क.** आरोपीचे वैयक्तिक जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

**ड.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/- चा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

**sd/-**

माणगांव, श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)
दिनांक : ०१.०८.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव.